REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018


# 'बनगरवाडी' कादंबरीतील निसर्गचित्रण

प्रा. सुभाष जयसिंग कदम
कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर.

## प्रास्ताविक

व्यंकटेश दिगंबर माडगूळकर यांचे नाव मराठी साहित्यात आदराने घेतले जाते. त्यांचा जन्म ५ एप्रिल, १९२७ मध्ये सांगली जिल्ह्यातील माडगूळ या गावी झाला. माडगूळकरांनी कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णने, अनुवादीत साहित्याची विपूल प्रमाणात निर्मिती केली. यासोबतच त्यांनी चित्रपटांच्या पटकथा लिहून त्या अजरामर केल्या. त्यांनी 'माणदेशी माणसे', 'गावाकडच्या गोष्टी', 'हस्ताचा पाऊस', 'सीताराम एकनाथ', 'काळी आई', 'जांभळीचे दिवस' हे कथासंग्रह लिहिले. 'बनगरवाडी', 'वावटळ', 'पुढचं पाऊल', 'कोवळे दिवस', 'करूणाष्टक' आणि 'सत्तांतर' या कादंबऱ्यांचे लेखन केले. यासोबतच 'तू वेडा कुंभार', 'सती', 'पति गेले गं कोठेवाडी' ही नाटके आणि 'कुणाचा कुणाला मेळ न्हाई', 'बिनबियांचे झाड' ही लोकनाट्य लिहिली. त्यांचे 'प्रवास एका लेखकाचा' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. अशा या गुणवान लेखकाने २८ ऑगस्ट, २००१ साली या जगाचा निरोप घेतला.

व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' ही अतिशय लोकप्रिय कादंबरी आहे. माडगूळकर यांच्या आयुष्यातील बराचसा भाग माणदेश भागात गेला आहे. 'महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातून वाहणारी पूर्ववाहिनी नदी आहे. या नदीचा उगम माण तालुक्यातील कुळकजाई भागाच्या परिसरातील सीतामाई डोंगररांगातून होतो. पुढे ती सरकोली येथे भीमा नदीला मिळते. या नदीच्या काठाला असलेल्या सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील परिसराला माणदेश म्हणतात.' व्यंकटेश माडगूळकर ज्या प्रदेशात जन्मले, वाढले तो प्रदेश म्हणजे माणदेश होय. या कादंबरीतील घटना या माणदेशातील धनगरंची वस्ती असलेल्या लेंगरवाडीत. लेंगरवाडी ही लेखकाच्या माडगूळ गावापासून जवळ असल्याने तिला माडगूळकरांनी 'बनगरवाडी' हे नाव दिले. त्यामुळे तेथील वातावरणाचा त्यांना जवळून अभ्यास आहे. त्यांनी लिहिलेल्या 'बनगरवाडी' या प्रादेशिक कादंबरीतून याचा प्रत्यय येतो. त्यांची कादंबरी ही माणदेश प्रदेशातील आहे. माणदेश हा प्रदेश निसर्गाच्या अवकृपेमुळे ओसाड माळरान आणि दुष्काळीपट्टा बनला. यामुळे सांस्कृतिक जीवनावर निसर्गाचा मोठा प्रभाव असलेला दिसतो. निसर्ग म्हणजे केवळ पाने-फुले, झाडे, वेली इतकाच मर्यादित अर्थ अभिप्रेत नसून ग्रामीण कृषिसंस्कृती आणि एकूण जीवसृष्टी, सृष्टिक्रम यांचाही त्यात अंतर्भाव होतो. मानवाने कितीही प्रगती केली असली तरी तो निसर्गावर मात्र विजय मिळवू शकला नाही. 'बनगरवाडी' कादंबरीतील निसर्गचित्रण शोधण्याचा हा प्रयत्न केला आहे.




बनगरवाडी कादंबरीविषयी डॉ. रत्नाकर बापूराव मंचरकर म्हणतात की, ''व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'बनगरवाडी'(१९५५) मध्ये मराठी ग्रामीण कादंबरीला वास्तवाचा खरा स्पर्श झाला. स्पर्शरूपरसगंधादी ऐंद्रिय ऐश्वर्य मिरवीत माणदेश येथे शब्दार्थजनित प्रतिमारूपाने प्रकट झाला. ऋतुचक्राबरोबर धनगरी जीवनाचे धागे गुंफले गेले आणि एका

जमातीचे जगणे बारकाव्याच्या तपशिलानिशी उलगडत गेले. मराठी ग्रामीण कादंबरीतील मैलाचा दगड ठरावी अशाच तोलामोलाचीही 'बनगरवाडी' आहे. १९६० नंतर मात्र माडगूळकरांच्या ग्रामीण कादंबरीने परिसर प्राधान्य आणि समूहचित्रण यापेक्षा वेगळ्या वाटा चोखाळल्या.'' यावरून व्यंकटेश माडगूळकरांच्या कादंबरी लेखनाचे महत्त्व अधोरेखित होते.

**निसर्गवर्णने:-**

व्यंकटेश माडगूळकर 'बनगरवाडी' कादंबरीतून निसर्गवर्णने अधून-मधून ह्या कादंबरीत लिहित जातात. निसर्गवर्णने सुटी आहेत ह्या अर्थाने ह्या कादंबरीत उपरी आहेत. असा सर्वसामान्य ग्रह होणे शक्य आहे. 'जिराइतातली बाजरी हळूहळू वाढली पोटरीतून लांब दांड्यांची शेलाटी कणसे बाहेर पडली. हिरव्या ताटांवर तपकिरी रंगाची कणसे सर्वत्र डुलू लागली आणि लवकरच जांभळ्या फुलोऱ्यांनी फुलून गेली तो नाजूक फुलोरा डवरला आणि लहान मुंग्या कणसावर चढू लागल्या. मधमाश्या कणसांभोवती फिरू लागल्या. पिवळ्या रंगाची लहान फुलपाखरे जोडी-जोडीने तरंगत येवून बसू लागली. कधी धिगाणा घालणाऱ्या वाऱ्यावर फुलोरा उडू लागला आणि कणसे उघडी पडू लागली. बाजरीच्या बरोबरीने आत टाकलेले कडधान्याचे वेल पसरू लागले. मटकीच्या शेंगाचे झुपके कुठे कुठे दिसू लागले. हुलग्याला जोम आला. तुरीच्या उभार झाडावर सावळ्या शेंगा दाण्यांनी भरू लागल्या. भुईमूगाच्या मुळ्या अंडी धरू लागल्या. बांधा बांधावर उगवलेले कुर्डूचे पांढरे-जांभळे तुरे लागले आणि लवकरच फुलोऱ्यांन डवरलेली कणसे बाजरीच्या चमकदार दाण्यांनी टचटचली. चिवळांचे भवे भरारत ते दुधाने भरलेले दाणे खाऊ लागले.' (बनगरवाडी, पृ. ४५) येथे व्यंकटेश माडगूळकर सृष्टीतील बदलांचे सूचन करताना अत्यंत सूक्ष्म निरीक्षणे नोंदवितात. वरूणराजाच्या आगमनानंतर कृषक आपल्या शेतात बियाणांची लागण करतो. काही कालावधीनंतर बियाणांचे अंकुरण होते. हळू हळू त्या अंकुराचे रोपट्यात रूपांतर होऊन त्याला कणसे लागतात. कणसात दाणे भरताना सृष्टीतील अनेक जीव त्याकडे आकर्षित होतात. कणसाभोवती घिरट्या घालून आपले उदरभरण करतात. या ठिकाणी माडगूळकर शेतातील विविध पिकांभोवती घिरट्या घालणाऱ्या मुंग्या, मधमाश्या, फुलपाखरे यांचे जीवनचित्रण अत्यंत तन्मयतेने करतात. 'बनगरवाडी'च्या कुशीत असणाऱ्या शेतातील पिक आणि पिकाभोवती घोंगावणारी सृष्टीतील पक्षांचे चित्रण मनाला भुरळ पाडून जाते.

**निसर्ग चित्रांची मालिका:-**

माडगूळकर हे चित्रकाराप्रमाणे विभिन्न निसर्ग चित्रे शब्दबद्ध करतात. या योजनेमुळे विशिष्ट प्रादेशिक वातावरणाची निर्मिती होवून कथानकाला प्रभावी पार्श्वभूमी लाभते. 'बनगरवाडी' त अशा निसर्ग चित्रांची मालिकाच दिसते. 'टोळ उड्या हाणू लागले. सरडे सरसरले, कावळ्यांची काव-काव ऐकू आली. बिळातून घोरपडींनी मुंडकी बाहेर काढली.'(बनगरवाडी, पृ. २) हे उल्लेख कल्पनाबाह्य वाटत असले तरीही समर्पकतेचे सौंदर्य त्यात आहे. माडगूळकर पहाटे सूर्योदयापर्यंतचे वर्णन अत्यंत रमणीयतेने करताना आढळतात. ''माळावरून गारं, झोंबरे वारे वाहू लागले. चांदण्याचे तेज कमी झाले. धड चांदण्याचा उजेड नाही. धड उजाडलेलेही नाही, अशी मधली अवस्था झाली. बाभळ, तरवटा यासारख्या झुडपांचा ओळखू येणारा वास जाणवू लागला. वाटेवरची धूळ पायाला गार लागू लागली. बघता बघता काळोख दिसेनासा झाला.

**दुष्काळी स्थितीचे वर्णन :-**

माडगूळकरांनी बनगरवाडीतील दुष्काळाचे अतिशय हृदयद्रावक चित्रण केले आहे. मूळात 'बनगरवाडी' हे गावच ओसाड असून ते दुष्काळाने ग्रासलेले आहे. त्यामुळे दुष्काळात बनगरवाडी अधिकच ओसाड व उदध्वस्त भासते. त्यात गावातील अनेक घरांना ठिकठिकाणी भोसकं पडली आहेत. त्यात वारा चमत्कारीक आवाज करतो. भुकेलेल्या मेंढरांनी रानातील चगळ न चगळ खाऊन टाकलेली. अधीर झालेला लांडगा धुळीवर पाय उमटवीत दाराशी खडखड करू लागतो. अशा अनेक दृश्यांनी अंगावर काटा आल्यावाचून राहत नाही. बनगरवाडी या प्रादेशिक कादंबरीतून लेखक ज्या ताकदीने निसर्गाच्या भारावलेपणाचे चित्रण करतात त्याप्रमाणे निसर्गाचे विनाशकारी दर्शनही घडवितात. तसेच माडगूळकर निसर्गातील विनाशकारी दुष्काळाचे चित्रण करतात. उदा. 'तिच्या खोपटाची काडे वाऱ्यांनी विस्कटलेली असतात. त्यात ठिकठिकाणी भोसके पडलेली आहेत. त्यात घुसून वारा चमत्कारी आवाज करत आहे. निर्मनुष्य झालेल्या बंद दारावर वारा धडका मारीत

आहे. जिकडे–तिकडे धुळ साचलेली. ढोर कुरतडली जात आहेत. धीट झालेला लांडगा धुळीवर पाय उमटवित बंद दाराशी खडबडू लागतो आणि गावाच्या वडावर गिधाडांनी तळ टाकलेला असतो.' (बनगरवाडी, पृ.९८ ) निसर्गाची अवकृपा झाल्यावर माणसांचे काही चालत नाही, असेच काहीसे चित्रण बनगरवाडीत येते. बनगरवाडीत दुष्काळाचे परिणाम अगदी स्पष्ट जाणवतात परिणामी हृदय पिळवटून टाकतात असे म्हटले तरी वावगे ठरू नये. दुष्काळामुळे गावातील लोक गावसोडून इतरत्र स्थलांतरित होतात. यानंतर गावाची परिस्थिती अत्यंत भयावह बनते. गाव निर्मनुष्य होऊन पडकी घरे, सर्वत्र उडालेले धुळीचे लोट, लांडग्यांचा हैदोस, गिधाडांचा गोंधळ यामुळे गाव अत्यंत भेसूर जाणवते.

### बनगरवाडीतील ऋतूचक्रः–

माणसाचे व्यक्तिमत्त्वाला सभोवतालचे वातावरण हे अधिक कारणीभूत असते. त्यामुळे कादंबरीत सजीव पात्रांची निर्मिती ही बहुतांशवेळा वातावरणावरच अवलंबून असते. प्राकृतिक, नैसर्गिक वातावरण हे उषःकाल संध्याकाळ, रात्र, पावसाळा, हिवाळा, उन्हाळा, ऋतू, शेते, जंगले इ. निसर्ग दृश्यांशी संबंधीत असते. चैत्राच्या महिन्यातील उन्हाचे चटकेही माणसाला बसल्याशिवाय राहत नाहीत. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा हे ऋतू आपआपले रूप घेऊन सृष्टीमध्ये अवतरतात. सौंदर्याची उधळण करणारा निसर्ग, दुष्काळ, महापूर, भूकंप असे संकटेही सोबतीला घेऊन येतो. बनगरवाडीतील निसर्ग हा कादंबरीचा अपरिहार्य भाग आहे. या कादंबरीतील बराचसा भाग हा दुष्काळयुक्त वर्णनाने व्यापला आहे. दुष्काळामुळे बनगरवाडीतील माळराने भकास झाली आहेत. माळाचा पिवळा–करडा रंग, उघडे–बोडके दगड, मध्येच दिसणार झाडाझुडपाचे हिरवे ठिपके, बोराटी, बाभळी, खुरटलेली झुडपे आणि त्यामधून जाणारी धुळीने भरलेली, दगडधोड्यांनी उचांवलेली, कुठे रूंद, तर कुठे अरूंद अशी गाडीवाट, बनगरवाडीचे जीवनही असेच भकास आहे. वातावरणाचा तंत्रदृष्ट्या विचार करीत असता प्रारंभी आपल्या डोळ्यासमोर भौगोलिक वातावरण येते. निसर्गाचे वर्णन हा त्यातील महत्त्वाचा भाग असतो. पात्रांच्या मनातील भावना, संघर्ष इ. रंगविताना मानवी कृती व विचार यांची पार्श्वभूमी म्हणूनही अशा निसर्गवर्णनाचा उपयोग केला जातो.

### पावसाळी चित्रणः–

बनगरवाडी हा दुष्काळी भाग असल्याने पावसाचे प्रमाण कमीच राहते. या थोड्याफार पावसाने समाजावर परिणाम होतो तसाच त्याच्या अभावानेच त्यांचे अस्तित्त्वही धोक्यात येते. पावसाळी परिस्थितीत बनगरवाडीतील धनगरांची धावपळ होते. याविषयी माडगूळकर म्हणतात की, ''मृगाचा पाऊस बनगरवाडीला झोडपत राहिला. भटकी कुत्री भिंतीच्या आडोशाला उभी राहिली. लवकर उघडीप होण्याचे दिसेना धनगरांची धावाधाव झाली. डोक्यावर रिकामे पोते घेऊन त्यांनी वाड्यात भिजणारी मेंढरे काढून झोपड्यात आणली. काडाने शाकारलेली घरे गळू लागली. सुरेख सारवलेली जमीन ठिकठिकाणी ओली होऊन उखणू लागली. तेव्हा धनगरणी चरफडल्या आणि गळणाऱ्या जागी त्यांनी लहानमोठी भांडी ठेवून दिली. मेंढरांच्या धडपडीतून भरलेल्या भांड्यात ठिबकणाऱ्या पाण्याचा आवाज कान किटवू लागला. धाब्याच्या घरातून गळू लागले. तेव्हा डोक्यावर रिकामी पोती घेऊन धनगर माळवदावर चढले. जिथे पाणी साचले होते. माळवदाला भोक पाडून आता शिरत होते, ती भोके त्यांनी दगडमाती घालून तात्पुरती बुजवली.' (बनगरवाडी, पृ. ३५) दुष्काळाने त्रासलेल्या बनगरवाडीकरांना सवय नसलेल्या पावसामुळे अनेक अडी–अडचणींना सामोरे जावे लागते. मृगाच्या पावसाचे दमदार आगमन झाल्याने बनगरवाडीकरांची धांदल उडते. धनगरांची गळकी घरे, भिजणारी मेंढरे यांना सावरता सावरता पळता भुई थोडी होते. माळवदावर सर्वत्र पाणी साचते, ते माळवदाला भोक पाडून आत शिरू लागल्यावर धनगरांची पार तारांबळ उडते. अशाप्रकारे पावसात धनगरांची उडणारी तारांबळ माडगूळकरांनी येथे शब्दबद्ध केली आहे.

### बनगरवाडीतील संस्कृतीः–

'संस्कृतीचा अर्थ सर्वसमावेशक कृती असा होतो. धर्मासह समग्र अंर्तबाह्य जीवनाच्या उन्नत अवस्थेसाठी संस्कती हा शब्द वापरला जातो. प्रकृती म्हणजे निसर्ग, विकृती म्हणजे निसर्गात होणारा विकार आणि संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार.'(भारतीय संस्कृती कोश खंड नववा) 'बनगरवाडी' कादंबरीतील संस्कृती ही

निसर्गावर आधारलेली आढळते. दुष्काळ हा नशिबाचाच भाग आहे. बनगरवाडी दुष्काळी भौगोलिक स्थळी आहे. बनगरवाडी भागात पावसाचे प्रमाण कमी आहे. पण बनगरवाडीच्या संस्कृतीत देवाला जास्त महत्त्व आहे. तेथील लोक देववादी आहेत. बनगरवाडीच्या संस्कृतीत देव व दैववादाला आलेले महत्त्व केवळ अज्ञानामुळे नाही तर त्यांच्या सततच्या कष्टमय, निसर्गावलंबी जगण्यातून आले आहे. देव आणि दैववादाने त्यांना जगण्याची हिंमत सोशिकपणे दिलेली आहे.

**निष्कर्षः-**

१) बनगरवाडीतील निसर्ग ग्रामीण व्यक्तीजीवनावर, ग्रामीण समाजावर आणि ग्रामीण संस्कृतीवर परिणाम करणारा आहे किंबहुना हे जीवन निसर्गावलंबी असे आहे.

२) माडगूळकरांनी आपल्या लेखणीतून बनगरवाडीतील निसर्ग मोहक केला आहे.

३) बनगरवाडी कादंबरीतून सृष्टीक्रमाचे प्रत्ययकारी चित्रण येते.

४) व्यंकटेश माडगूळकर यांची बनगरवाडीतील निसर्गचित्रण समर्थपणे येते.

५) कादंबरीतून दुष्काळ, निसर्गाची विविध रूपे, निसर्गाचा ग्रामीण माणसावर होणारा चांगला-वाईट परिणाम या घटकांचा लेखकाने सर्वोतोपरी परामर्श घेतला आहे.

६) नैसर्गिक वातावरण हे 'बनगरवाडी' या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

**संदर्भग्रंथः-**

१) माडगूळकर व्यंकटेश, बनगरवाडी.

२) जोशी सुधा, व्यंकटेश माडगूळकर माणदेशी माणूस आणि कलावंत.

३) नलगे चंद्रकुमार, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, रिया पब्लिकेशन, कोल्हापूर, २०१३.

४) इंगोले कृष्णा, माणदेश स्वरूप आणि समस्या.